# प्रकरण - सहा

# निष्कर्ष आणि शिफारशी

# प्रकरण - ६ वे

## निष्कर्ष आणि शिफारशी

६•१ प्रस्तावना

६•२ अध्यापकांची शैक्षणिक अर्हता व अनुभव

६•३ मूल्ये आणि त्यांचे संक्रमण

६•४ मूल्य शिक्षणाबाबतची कृतिसत्रे / शिबिरे

६•५ मूल्यांचे मूल्यमापन

६•६ सर्वसाधारण निष्कर्ष आणि शिफारशी

६•७ पुढील संशोधनासाठी कांही विषय

=0=0=0=0=0=

# प्रकरण - ६ वे

## निष्कर्ष आणि शिफारशी

### ६.१ प्रस्तावना :

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय " उच्च प्राथमिक स्तरावरील प्रथमस्तर मराठीच्या पाठयपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्य शिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास " हा असून या विषयाच्या संदर्भात शिक्षक पाठयपुस्तकांचे अध्यापन करत असताना पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्याच्या दृष्टीने कोणते प्रयत्न करतात? मूल्ये रुजवण्याचे दृष्टीने काही उपक्रम योजतात की ? मूल्यांच्या संदर्भात शिक्षकांचे शिबिर अथवा कृतिसत्र झालेले आहे का? संक्रमित मूल्यांचे मूल्यमापन करता येईल का ? त्याचे निश्चित प्रमाण ठरविता येईल का ? मूल्याचे मूल्यमापन कशा पध्दतीने करता येईल ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गामधील मराठीचे अध्यापन करणा-या शिक्षकांसाठी प्रश्नावली तयार केली होती. ( या प्रश्नावलीचे विश्लेषण प्रकरण क्रमांक १ पृष्ठांक २६ ते २८ वर केलेले आहे.)

प्रकरण क्रमांक ५ मध्ये या प्रश्नावलीद्वारा प्राप्त झालेल्या सामग्रीचे विश्लेषण करुन अन्वयार्थ लावलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यावर आधारित निष्कर्ष आणि शिफारशी सादर केलेल्या आहेत. तसेच पुढील संशोधनासाठी काही विषय सुचविले आहेत.

६•२ अध्यापकांची शैक्षणिक अर्हता व अनुभव :

प्रश्नावलीला प्रतिसाद देणा-या शिक्षकांची पात्रता पाहिली यांची एकत्रित माहिती सारणी क्रमांक ५•१ मध्ये दिलेली आहे• यावरुन असा निष्कर्ष निघतो की, उच्च प्राथमिक स्तरावर मराठीचे अध्यापन करु शकणारे ६० पैकी ५९ शिक्षक योग्य शैक्षणिक पात्रता धारक आहेत• यांचे शेकडा प्रमाण ९८•३४ इतके आहे• ६० पैकी केवळ १ शिक्षक (१•६६%) बी•कॉम• असून तो अप्रशिक्षित आहे• या शिक्षकाने डी•एड्•प्रशिक्षणातील पदविका मिळविणे असल्याचे आहे•

सारणी क्रमांक ५•२ मध्ये प्रतिसाद देणा-या शिक्षकांचे अनुभव दिलेले आहेत• अध्यापकांचा एकूण सरासरी अनुभव ८•५ वर्षे इतका आहे• ६ ते १५ वर्षे अनुभव असलेले शिक्षक ४८•३४% इतके आहेत• हे पदवीधर प्रशिक्षित असून त्यांच्या अनुभवाची मते ग्राहय धरावयास हरकत नाही• सारणी क्रमांक ५•३ मध्ये इयत्ता ५ वी ते ७ वी वर्गांना मराठी विषय शिकवण्याचा अनुभव असलेल्या प्रतिसादकांची संख्या दिलेली आहे• १ते १५ वर्षे मराठीचे अध्यापन करणा-या शिक्षकांची संख्या ६० पैकी ५० इतकी आहे• मराठी हा विषय दीर्घ काळ शिकविल्याने त्यांची मते मानावयास हरकत नाही• पाठयपुस्तकांचे पुर्नमुद्रण दर दहा वर्षांनी केले जाते• या बदलाची जाणीव या माध्यम पातळीवर अध्यापन करणा-या शिक्षकांना आहे• हा निष्कर्ष निघतो•

वरील निष्कर्षावरुन पुढील शिफारस करण्यात येत आहे, १९८६ मध्ये नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अमलात येत आहे• या नवीन अभ्यास-क्रमास अनुसरुन पाठयपुस्तकांची रचना केलेली आहे• या नव्या धोरणामध्ये

मराठी विषयाची कोणती उद्दिष्टे आहेत हे समजून घेऊन त्यानुसार अध्यापनामध्ये अंमलबजावणी करावी.

६.१ <u>मूल्ये आणि त्यांचे संक्रमण</u> :

प्रस्तुत विभागामध्ये प्रकरण क्रमांक ५ मधील ५.४ मध्ये मराठीचे अध्यापन करताना जाणीवपूर्व मूल्ये संक्रमित केली जातात की नाही या प्रश्नास प्रतिसादकांनी प्रतिसाद दिलेला आहे. मिळालेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावल्यानंतर जे निष्कर्ष निघतात त्यांचे विवरण केले आहे व त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.

सारणी क्रमांक ५.४ वरून ( मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण करण्यासंबंधी अध्यापकांचे मत ) खालील निष्कर्ष निघतात. ६० अध्यापकांपैकी ५२ अध्यापकांनी (८६.६७%) मराठीचे अध्यापन करतांना पाठ्यपुस्तकांतील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण केले जाते असे नमूद केले आहे. ६० पैकी ८ प्रतिसादकांनी (१३.३३%) मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नाहीत असे मत व्यक्त केले आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, मराठीच्या अध्यापनातून मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात. हे स्पष्ट होते.

सारणी क्रमांक ५.५ मध्ये मूल्य संक्रमणाचे मार्गांचा विचार करताना ( पृष्ठांक१२९ते१४१) प्रामुख्याने खालील मार्ग स्पष्ट होतात. मिळालेल्या प्रतिसादांच्या संख्येसह उत्तरत्याक्रमाने पुढे दिलेले आहेत.

| अ•नं• | मूल्ये संक्रमणाचा मार्ग | प्रतिसाद संख्या |
|---|---|---|
| १• | थोर पुरुषांची चरित्रे, आदर्श राजे, संताच्या जीवनातील प्रसंग गोष्टी रुपाने सांगून मूल्यांचे संक्रमण करता येते• | १८ |
| २• | अध्यापन प्रभावीपणे करुन मूल्य संक्रमण करता येते | १० |
| ३• | सांस्कृतिक कार्यक्रम, नवोपक्रमातून मूल्य संक्रमण करता येते | ९ |
| ४• | राष्ट्रीय सण, थोर पुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्यावर आधारित कार्यक्रमाद्वारे मूल्य संक्रमण करता येते• | ७ |
| ५• | दृक्-श्राव्य साधनांचा वापर करुन मूल्ये ठसविता येतात• | ६ |
| ६• | पाठाच्या आशयाचे स्पष्टीकरणार्थ दिलेले संदर्भ, उदाहरणे, दाखले, दृष्टांत देवून मूल्यारोपण करता येते• | ३ |
| ७• | शाळेतील गुणी विद्यार्थी, शिक्षक, समाजातील आदर्श व्यक्ती यांचा विद्यार्थ्यांसमोर गुण-गौरव करुन, सत्कार करुन मूल्यांचे संक्रमण करता येते• | २ |
| ८• | दैनंदिन जीवनातील घडणा-या घटनेद्वारे, प्रत्यक्ष कृतीतून, प्रसंगाद्वारे, संस्था भेटी, सहलीद्वारे | १ |

| अ.नं. | मूल्ये संक्रमणाचा मार्ग | प्रतिसाद संख्या |
|---|---|---|
| | मूल्यसंक्रमण करता येते. शिक्षकांचे आदर्श आचरण व मूल्यांचे महत्व सांगून मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रूजविता येतात. | |

सारणी क्रमांक ५.५ वरून अशी शिफारस करता येते की, जे शिक्षक इतर मार्गांचा अवलंब करीत नसतील त्यांनी त्या मार्गांचा अवलंब करावा.

सारणी क्रमांक ५.७ मध्ये ( पृष्ठांक १५१ ) मूल्य संक्रमणाच्या प्रमाणावरून खालील निष्कर्ष निघतात.

मूल्ये मोठ्या प्रमाणात संक्रमित होतात असे ५२ पैकी ६ प्रतिसादकांचे मत आहे.

मूल्ये मध्यम प्रमाणात संक्रमित होतात असे ५२ पैकी ३६ प्रतिसादकांचे मत आहे.

मूल्ये अल्पप्रमाणात संक्रमित होतात असे ५२ पैकी १0 प्रतिसादकांचे मत आहे.

बहुसंख्य प्रतिसादकांच्या मतानुसार ६९.२३% मूल्ये मध्यम प्रमाणात संक्रमित होतात. याचा अर्थ मूल्ये ही मोठ्या प्रमाणात संक्रमित होत नाहीत.

सारणी क्रमांक ५.८ ( पृष्ठांक १४६ )मध्ये मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नसल्याची कारणे सांगितलेली आहेत.

| अ॰नं॰ | कारणे | प्रतिसादक संख्या |
|---|---|---|
| १॰ | परीक्षा पद्धतीत मूल्यांवर आधारित प्रश्न नाही॰ त्यामुळे अध्यापनामध्ये मूल्ययुक्त दृष्टी नाही॰ | ४ |
| २॰ | मूल्ये शिकवण्यावर भर दिल्यास अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही॰ | २ |
| ३॰ | मूल्ये संक्रमित करणे हे शिक्षणाचे उद्दीष्ट नाही॰ | १ |
| ४॰ | दैनंदिन व्यवहारात मूल्यांचा उपयोग होत नाही॰ | १ |

वरील कारणांचा मागोवा घेतल्यानंतर पुढील प्रमाणे शिफारस करता येईल॰

मूल्ये शिकविली जात नसतात॰ मूल्यांचे संक्रमण हे प्रसंगानुसार मुलांच्यामध्ये होत असतेच त्यासाठी शिक्षकांनी अध्यापनाच्यावेळी तशा प्रकारचे वातावरण निर्माण करणे महत्वाचे असते॰ समाजधारणेसाठी, स्थैर्यासाठी मूल्यांची अत्यंत आवश्यकता आहे याची जाणीव शिक्षकाला असली पाहिजे॰

सारणी क्रमांक ५॰८ मध्ये मूल्य संक्रमणातील अडथळे कोणते आहेत त्याची कारणे विशद केलेली आहेत॰ त्याचा उतरता क्रम खालील प्रमाणे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

| अ.नं. | कारणे | प्रतिसाद संख्या |
|---|---|---|
| १. | शाळेत होणारे संस्कार तात्पुरते असून कौटुंबिक व समाज जीवनातील दुर्गुणतेचा प्रभाव विद्यार्थ्यांवर अधिक प्रमाणात दिसून येतो. | १५ |
| २. | शालेय जीवनातील औपचारिकपणा, शालेय परिसर, पुस्तकीज्ञानावर भर, साचेबंद पध्दतीचा वापर, शैक्षणिक साधनांचा अभाव | १२ |
| ३. | सर्व शिक्षणाचा पाया म्हणजे मूल्यशिक्षण हा दृष्टीकोन शिक्षकाच्या अध्यापनातून स्पष्ट होत नाही, शिक्षकांना मूल्याबाबत प्रशिक्षण नाही, शिक्षकांवर अशैक्षणिक कामाचा वाढता बोजा, शिक्षकांना अनेक विषय शिकवावे लागतात. | १० |
| ४. | विद्यार्थी परीक्षार्थी बनत चालला आहे, शिक्षण नोकरीसाठी ही धारणा, विद्यार्थ्यांची विलासीवृत्ती, अनादरवृत्ती, मूल्याबाबत उदासिनवृत्ती, मूल्यांचा मूल्यमापनाशी संबंध नाही. | ६ |
| ५. | प्रत्येक शाळेत वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या, शिक्षक-विद्यार्थी संबंधामधील जिव्हाळ्याचा अभाव | २ |
| ६. | प्रसार माध्यमांचा बालकांवर होणारा अनिष्ठ परिणाम | २ |

सारणी क्रमांक ५.८ मधील कारणावरून पुढील शिफारशी कराव्याशा वाटतात.

शाळेत होणारे तात्पुरते संस्कार दीर्घ काळपर्यंत टिकून राहण्यासाठी शिक्षक-पालक मेळावा घेवून घरी, समाजामध्ये संस्कारयुक्त वातावरण कसे वाढेल याबाबत विचार करता येतो.

शालेय वातावरणामध्ये शिक्षकाने अनौपचारिकता आणावी, विद्यार्थी केंद्रित अध्यापन पध्दतींचा वापर करावा. शैक्षणिक दृक्-श्राव्य साधनांचा वापर करून मूल्ये रूजवता येतील.

सर्व विषयाच्या माध्यमातून संस्कार करावयाचे असतात. या संस्कारातून मूल्ये रूजवायची असतात ही दृष्टी प्रत्येक शिक्षकांना असली पाहिजे. शिक्षकांना काम नियमानुसार द्यावे, त्यांना अवांतर कामे सांगू नयेत.

विद्यार्थी केवळ परीक्षार्थी न बनता ज्ञानार्थी बनला पाहिजे असा शिक्षकांचा प्रयत्न हवा. विद्यार्थ्यांची अध्यायनाची गोडी वाढविली पाहिजे.

शाळेमध्ये प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची कमाल मर्यादा ४० असावी. शिक्षक विद्यार्थ्यांचे संबंध जिव्हाळ्याचे असले पाहिजेत.

सारणी क्रमांक ५.९ (पृष्ठांक १६१ )अनुसार उच्च प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांत मूल्ये चांगल्या त-हेने संक्रमित करण्यासाठी शिक्षक पुढील मार्गांचा अवलंब करतात असे आढळून आले.

| अ॰नं॰ | मार्ग | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- |
| १॰ | शिक्षकांचे चारित्र्य आदर्श हवे, विद्यार्थ्यांनी त्यांचे आचरण अनुसरावे, शिक्षकाने विद्यार्थ्याला समजून घेतले पाहिजे॰ | २९॰७१ |
| २॰ | समान मूल्ये असणारे पाठ सलग शिकवावेत, पाठातील घटनावर प्रसंगनिर्मिती हुबेहुब करावी, मूल्य केंद्रित अध्यापन पध्दतीचा वापर करावा॰ | २२॰९७ |
| ३॰ | विद्यार्थ्यांना कर्तव्याची जाणीव करून द्यावी, त्यांच्यामधील न्यूनगंडतेची भावनानष्ट करून मूल्यांचे महत्त्व पटवून दिले पाहिजे॰ | २०॰२७ |
| ४॰ | शिक्षकांना मूल्याबाबत प्रशिक्षण द्यावे, माता-पित्यांचे उद्बोधन वर्ग घ्यावेत, शाळा, घरे येथील वातावरण संस्कारक्षम बनवावे॰ | १०॰८१ |
| ५॰ | पौराणिक, ऐतिहासिक, उदाहरणांचा, व दृष्टांतांचा वापर करावा॰ कथा, श्लोक, सुविचार माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये संक्रमित करता येतात॰ | ८॰११ |
| ६॰ | मूकबधीर विद्यालय, मतिमंद विद्यालय, अनाथाश्रम, अपंगासाठी कार्य करणारी संस्था अशा संस्थाना भेटी देवून विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याबाबत सहानुभूति निर्माण करता येईल॰ | ५॰४१ |

| अ.नं. | मार्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ७. | पालकांना किंवा तज्ञ व्यक्तींना निमंत्रण देऊन " विविध धर्मातून एकता " या विषयावर सहविचार सभा आयोजित करता येईल. | २.७० |

यावरून पुढील शिफारशी कराव्याशा वाटतात.

१. शिक्षकाचे चारित्र्य आदर्श असले पाहिजे.

२. पाठातील मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी मूल्यकेंद्रित अध्यापन पध्दतीचा वापर केला पाहिजे.

३. विद्यार्थ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिल्यास मूल्यांचा स्वीकार सहजरित्या होईल.

४. शिक्षकांना मूल्यशिक्षणाचे प्रशिक्षण दिले पाहिजे. माता-पित्यांचे मूल्याबाबत उद्बोधन वर्ग घ्यावेत.

५. समाजातील मूकबधीर, मतिमंद, अनाथ, अपंग विद्यालयांना भेटी देऊन तेथील विद्यार्थ्यांच्या बाबत शाळेतील विद्यार्थ्यांत सहानुभूती निर्माण करावी.

६. "विविध धर्मातून एकता" या विषयावर पालकांची सहविचार सभा शाळेमध्ये आयोजित कराव्यात.

सारणी क्रमांक ५.१० (पृष्ठांक १६६ ) मध्ये मिळालेल्या प्रतिसादावरून मूल्यशिक्षणाबाबत शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका असाव्यात असे

९१•६७% शिक्षकांचे मत आहे• बहुतांश शिक्षकांना मार्गदर्शनासाठी हस्त-पुस्तिकेची आवश्यकता आहे असा निष्कर्ष काढता येतो•

सारणी क्रमांक ५•११ (पृष्ठांक १६७ ) वरून असा निष्कर्ष निघतो की, ९३•३३% अध्यापक विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीने अभ्यासपूरक कार्यक्रम योजले जातात•असे दिसते• ६•६७% अध्यापक अभ्यासपूरक कार्यक्रम घेतले जात नाहीत• असा प्रतिसाद दिलेला आहे• यावरून असा निष्कर्ष काढता येईल की, त्यांना कार्यक्रमाचा उद्देश समजला नसेल•

सारणी क्रमांक ५•१२ (पृष्ठांक१६८ते१७१) व सारणी क्रमांक ५•१३ (पृष्ठांक१७१ते१७३) वरून असा निष्कर्ष निघतो की, बहुतांश शाळांमधून प्रार्थना, परिसर स्वच्छता, राष्ट्रीय सण, थोरांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या, समान गणवेश, शिक्षक-पालक मेळावा असे उपक्रम राबविले जातात•

यासंदर्भात पुढील शिफारशी कराव्याशा वाटतात•

१• अभ्यासपूरक कार्यक्रमासंबंधीचे नियोजन सुबद्ध असले पाहिजे• प्रत्येक कार्यक्रमाचे उद्दिष्ट ठरविले पाहिजे•

२• काही शाळा केवळ बौद्धिक विषयाकडे अधिक लक्ष देतात• सह-शालेय व अभ्यासेतर उपक्रमांकडे त्यांचे दुर्लक्ष होते• असे न करता त्यांनी उपक्रमांचे महत्त्व जाणून आपल्याशाळेत उपक्रमांचे आयोजन करावे•

३• शालेय उपक्रमामध्ये काही ठराविक विद्यार्थीच सहभागी होतात असे दिसून येते• अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग कसा वाढेल यासाठी शिक्षकांचा प्रयत्न हवा•

४. वर्तमान स्थितीमध्ये देशापुढे काही समस्या आहेत. त्यांच्यावरती उपाय म्हणून सद्भावना दिनासारखे अभिनव उपक्रम हाती घेवून ते यशस्वी करावेत.

५. काही शाळामधील उपक्रम स्तुत्य व प्रेरणादायी आहेत. शिक्षकांच्या शिबीरामध्ये अगर प्रशिक्षण काळामध्ये यांची चर्चा होणे महत्वाचे आहे. यामुळे ज्या शाळा ठराविक प्रकारचे उपक्रम योजतात त्यांना मार्गदर्शन मिळेल व त्यांचा वापर ते आपल्या शाळेत करतील.

## ६.४ मूल्य शिक्षणाबाबतची कृतिसत्रे / शिबिरे :

सारणी क्रमांक ५.१४ ( पृष्ठांक १७५ )मध्ये एकूण ६० प्रतिसादकां पैकी केवळ १४ प्रतिसादकांना कृतिसत्राचा लाभ घेता आलेला आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, बहुसंख्य शिक्षकांना अशा कृतिसत्रामध्ये सहभागी होण्याची संधी मिळणे आवश्यक आहे.

सारणी क्रमांक ५.१५ ( पृष्ठांक १७७ )मध्ये ज्या शिक्षकांनी (२३.३३%) कृतिसत्रात भाग घेतलेला आहे, त्यांचे विश्लेषण केलेले आहे. या सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, किमान अध्ययन क्षमता, नवीन अभ्यासक्रम, नवे शैक्षणिक धोरण, भाषाविषयाचे अध्यापन अशा सेवांतर्गत प्रशिक्षणातून व कृति सत्रातून शिक्षकांना मूल्यशिक्षणाबाबत थोडासा परिचय करून दिलेला आहे.

मूल्यशिक्षणाच्या संदर्भात काही ठराविकच कृतिसत्रे झालेली आहेत. याचा लाभ ६० प्रतिसादकांमधील केवळ २ शिक्षकांना मिळालेला आहे.

उपरोक्त निष्कर्षावरून पुढील शिफारशी सुचविता येतात.

१. मूल्यशिक्षणाबाबतची स्वतंत्र कृतिसत्रे आयोजित करावीत. यामध्ये प्रशिक्षण विद्यालये, प्राथमिक शिक्षण मंडळ, महानगरपालिका, इत्यादींनी सदरची कृतिसत्रे भरवावीत.

२. शिक्षक- पालक यांनी मूल्य शिक्षणा बाबतची शिबिरे आयोजित करावीत.

## ६.५ मूल्यांचे मूल्यमापन :

सारणी क्रमांक ५.१७ (पृष्ठांक १८० )मध्ये मूल्ये आणि परीक्षा यांचा संबंध जोडावा असे ६० पैकी ५२ प्रतिसादकांनी (८६.६७%) मत व्यक्त केले आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, मूल्ये आणि परीक्षा याचा संबंध जोडता येईल ; पण परीक्षा फलावरून विद्यार्थ्यांनी मूल्ये स्विकारलेली आहेत की नाहीत हे निश्चित सांगता येत नाही.

सारणी क्रमांक ५.१९ (पृष्ठांक १८२)मध्ये संक्रमित झालेल्या मूल्यांचे मूल्यमापन करता येते की नाही याला मिळालेल्या प्रतिसादकावरून असा निष्कर्ष काढता येतो की, ९० टक्के प्रतिसादकांनी मूल्यमापन शक्य आहे असे म्हटले आहे.

सारणी क्रमांक ५.२० (पृष्ठांक १८३) मध्ये/वरून असे अनुमान काढता येईल की, ७५ टक्के प्रतिसादकांच्या मतानुसार विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये किती प्रमाणात रूजली आहेत याचे मूल्यमापन करता येते.

सारणी क्रमांक ५.२१ (पृष्ठांक १८५ ते १८७)मध्ये प्रतिसादकांनी संक्रमित मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे मार्ग सांगितलेले आहेत. त्याचे शेकडा प्रमाण पुढील प्रमाणे :

| अ.नं. | मार्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | शाळा, समाज, कुटुंब या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे निरीक्षण करून मूल्यांचे मूल्यमापन करावे | २३.६५ |
| २. | झालेल्या विविध उपक्रमाच्यावेळी विद्यार्थ्यांची पदनिश्चियन श्रेणी वापरून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल. | २१.६२ |
| ३. | विद्यार्थ्यांच्या संकलित नोंदपत्रकावरून मूल्यांचे मूल्यमापन करणे. | १५.५४ |
| ४. | विद्यार्थ्यांवर सोपविलेल्या जबाबदारीवरून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल. | १२.१६ |
| ५. | समाजमिती व प्रक्षेपन तंत्राचा वापर करून मूल्यांचे मूल्यमापन करावे. | १०.१४ |
| ६. | विद्यार्थ्यांच्या दैनंदिनी पाहून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल. | ८.११ |
| ७. | विद्यार्थ्यांच्या पालकांशी वारंवार संपर्क ठेवून व मूल्यांचे मूल्यमापन करता येईल. | ५.४१ |
| ८. | विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंधलेखनावरून, चित्ररेखाटनावरून, वक्तृत्वावरून, मूल्यांचे मूल्यमापन करावे. | ३.३८ |

वरील तारणी वरून पुढील निष्कर्ष काढलेले आहेत.

१. मूल्यांचे मूल्यमापन ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे निरीक्षण सतत हवे.

२. मूल्यांचे मूल्यमापन हे काटेकोरपणे करता येत नाही. कारण व्यक्तीचे स्थळ, कालानुसार वर्तन बदलते. त्यामुळे मूल्यांचे मूल्य मापन स्थूल स्वरूपात करता येते.

मूल्यांच्या मूल्यमापनाबाबत पुढील प्रमाणे शिफारशी सुचविलेल्या आहेत.

(१) संक्रमित झालेल्या मूल्यांचे मूल्यमापन स्थूलस्वरूपात करता येते.

(२) मूल्यांच्या मूल्यमापनासाठी एकाच व्यक्तीचे वारंवार निरीक्षण करणे महत्वाचे आहे.

(३) सर्वंकष मूल्यमापन करून मूल्याबाबत अ, ब, क, अशा श्रेणी द्याव्यात.

(४) मूल्यसंक्रमण ही एक मानसिक प्रक्रिया आहे. त्यामुळे मूल्यशिक्षण कृतिसत्र, शिबीरामध्ये मूल्यांच्या मूल्यमापनाबाबत मार्गदर्शन करावे.

(५) मूल्यांच्या मूल्यमापनामध्ये व्यक्तिनिष्ठता न येता वस्तुनिष्ठता कशी निर्माण होईल याचा शिक्षकाने विचार केला पाहिजे.

६.६ <u>सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी</u> :

(१) मूल्य संक्रमण हे प्रसंगानुरूप होत असते. म्हणजे संस्कारासाठी पोषक वातावरणाची गरज असते. असे वातावरण शाळा, घर, समाज, राज्य, राष्ट्र या सर्व पातळीवर असणे आवश्यक आहे. असे वातावरण कसे

टिकून राहील याचा विचार सर्व स्तरावरील मानवी घटकाने केला पाहिजे.

(२) शाळेमधील मूल्यसंक्रमण केवळ शाब्दिक स्वरूपाचे असते. त्याचा बौध्दिक पातळीवर विचार होतो. मूल्यांचा विचार भावनिक पातळीवर होऊन ते मूल्य त्यांच्या स्थिरवृत्तीमध्ये संक्रमित होऊन ते क्रियात्मक पातळीमध्ये उतरले पाहिजे. असा त्रिविध स्वरूपाचा विकास होऊन आदर्श व्यक्तिमत्वाची घडण होईल याची जाणीव शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, इतर कर्मचारी यांना असली पाहिजे.

(३) सध्याच्या परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये संक्रमित करण्यामध्ये अनेक अडचणी आहेत हे सकृत दर्शनी दिसून येते. पण शिक्षकाने अशा अडचणी व समस्या सांगून पलायनवाद स्विकारू नये. अशा परिस्थिती-तही शाळेकडून मूल्यांची जोपासना होते, त्याची वृध्दी होते हा ध्येयवाद शिक्षकांनी बाळगला पाहिजे.

(४) नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार जी क्रमिक पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. त्यामध्ये दहा गाभाभूत घटकांच्या दृष्टीने पाठ्यांशाचा समावेश केलेला आहे. ही गाभाभूत घटकाची दृष्टी सर्वच विषयातून विद्यार्थ्यांमध्ये आली पाहिजे याची जाणीव शिक्षकांना हवी.

(५) मूल्य संक्रमणासाठी प्राथमिक स्तर हा मानसशास्त्रीय दृष्टया योग्य आहे. यासाठी मूल्यशिक्षणाबाबतीत कृतिसत्रे व शिबिरे आयोजित करून मूल्याबाबतीत शिक्षकांना कोणती दृष्टी असली पाहिजे याची जाणीव करून दिली पाहिजे. प्रत्येक शिक्षकाला मूल्य शिक्षणाविषयी स्वतंत्र प्रशिक्षण द्यावे.

(६) प्रत्येक शाळेने नव नवीन अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमाचे आयोजन करून त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विविध मूल्यांचे रोपन करावे.

(८) शिक्षकांने विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे सातत्याने निरीक्षण करून वेळोवेळी नोंदी कराव्यात. त्या वस्तुनिष्ठ व विश्वसनीय असाव्यात. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वार्षिक गुणपत्रिकेमध्ये श्रेणी स्वरूपात मूल्यांचे मूल्य-मापन करता येईल.

६.७ पुढील संशोधनासाठी कांही विषय :

प्रस्तुत प्रकरणाच्या आतापर्यंतच्या भागात या संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी सादर केल्या. हे संशोधन करत असताना संशोधकाला संशोधन विषयाशी संबंधित कांही समस्या, जाणवल्या, कांही मर्यादा जाणवल्या व मर्यादा संशोशनविषयाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध आहे. विषयाच्या मर्यादेमुळे संशोधकाला त्या समस्यांच्या मूळाशी जाऊन सखोल, सांगोपांग व तपशीलवार परामर्श घेतलेला नाही. तथापि या समस्यांचा अभ्यास केला गेल्यास तो प्रस्तुत संशोधनाच्या सर्वांगिण, सम्यक आकलनास उपकारक होईल असे वाटते.

या समस्यांचा विचार करून पुढील संशोधनासाठी कांही विषय सुचविलेले आहेत, ते खालील परिच्छेदातून निर्देश केलेला आहे.

(१) प्रस्तुत संशोधन हे उच्च प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांच्या संदर्भात व पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाच्या संदर्भाच पुरतेच मर्यादित आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी शालेय अभ्यासक्रमामध्ये

इतर हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित या विषयाच्या पाठ्यपुस्तकातून मूल्यांचा शोध घेता येईल. मूल्याच्या दृष्टीकोनातून त्या पाठ्यपुस्तकांचे अध्यापन कशा पद्धतीने करावे ? याबाबत संशोधन केल्यास मूल्याबाबत अधिक सखोल संशोधन कार्य होईल.

(२) शिक्षकांना सेवातंर्गत २८ दिवसाचे १0 दिवसाचे विविध विषयावर प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये सघन अभ्यासक्रम, किमान अध्ययन क्षमता, नवीन अभ्यासक्रम, नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यासारखे प्रशिक्षण दिले जाते. परंतु सर्व शिक्षणाचा पाया असणारे मूल्यशिक्षणाबाबतचे प्रशिक्षण क्वचित स्वरूपात दिले जाते. वरील विषयाच्या प्रशिक्षणासाठी ठराविक अभ्यास क्रम असतो. पण मूल्य शिक्षणाबाबत सेवांतर्गत प्रशिक्षणामध्ये कोणता अभ्यासक्रम असावा ? त्याची अंमलबजावणी कशी पद्धतीने करावी ? या बाबत संशोधन झाल्यास मूल्यशिक्षणासाठी अधिक उपकारक ठरेल.

(३) प्रस्तुत संशोधनामध्ये बहुतांश शिक्षकांनी मूल्यशिक्षणाबाबत शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका असावी असे मत व्यक्त केलेले आहे. मूल्यशिक्षणा बाबतची हस्तपुस्तिका अनुभवी व तज्ञ शिक्षकांकडून तयार करून घेता येईल. ही हस्तपुस्तिका कशी असावी ? त्याच्या मध्ये सैद्धांतिक व प्रात्यक्षिकाचे स्वरूप कसे असावे ? याबाबत संशोधन झाल्यास शिक्षकांना मूल्याविषयीचा दृष्टीकोन स्पष्ट होण्यास मदत होईल अशी आशा वाटते.

(४) सध्याचे शालेय वातावरण पाहिल्यास संस्कार करण्याच्या दृष्टीने फारसे पोषक नाही असे दिसून येते हे वातावरण शुद्ध स्वरूपाचे कसे होईल ? सामाजिक आणि राजकीय दबावापासून शालेय कामकाज कसे मुक्त राहील ? मूल्यसंक्रमणातील अडचणी कशा निवारण करता येतील ? याबाबतीत संशोधन झाल्यास ते उपकारक ठरेल.

(५) मूल्य सामाजिक संदर्भात ओळखले जाते. मूल्यांचा स्विकार व्यक्तीकडून होतो. मूल्यांचा स्विकार केला तरच समाज जीवन सुखमय, आनंदी बनेल. मूल्यांची मौलिकता इतकी असताना आधुनिक काळातील मानवाकडून मूल्यांचा स्विकार का होत नाही ? बहुतांश जनतेकडून मूल्यांचा स्विकार होण्यासाठी कोणत्या स्वरूपाचे उपाय योजता येतील? याबाबत मुलभूत संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे.

(६) एकूण समाजाची धारणा अशी आहे की, मूल्यशिक्षणाची जबाबदारी ही केवळ शाळेची आहे. मूल्यशिक्षणा संदर्भात शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, समाज, शिक्षण संस्थेमधील व्यक्ती, शिक्षणखात्या-मधील व्यक्ती, जबाबदार आहेत. यांच्या परस्पर संबंधाचा परिणाम विद्यार्थ्यांवर कसा पडतो ? त्यांच्यामधील आंतरक्रिया कशा असाव्यात? त्यांच्यामधील सहकार्य आणि सामंजस्य कसे राहील ? याबाबतीत संशोधन झाल्यास ते उपयुक्त ठरेल.

(७) संक्रमित झालेल्या मूल्यांचे मूल्यमापन करावयाचे झाल्यास मूल्यमापनाची कोणती साधने तयार करता येतील ? तयार केलेली साधने पर्याप्तता, यथार्थता, विश्वसनियता या दृष्टीने कितीपत योग्य आहेत? त्यांचा वापर करावयाचा झाल्यास तो कसा करावा ? वस्तुनिष्ठ मूल्यमापन कसे करता येईल ? याबाबतीत संशोधन झाल्यास मूल्यशिक्षण हा विषयाला अधिक व्यापकता येईल.

=0=0=0=0=0=